परभणी / दैनिक
शनिवार, दि. ६ सप्टेंबर २०२५
वर्ष : ३१ वे अंक : १४५
किंमत : १ रूपया पृष्ठे : ४
PRGI No.: MAHMAR/2016/69787
संपादक : नरसिंह घोणे,
मो.नं. ९४०५११२०००
कार्य. संपादक : सत्यजीत गावंडे,
मो.नं. ९२८४६९५५८३
www.marathwadakesari.com

# मराठवाडा केसरी

बातम्या,
जाहिराती व
निमंत्रणासाठी संपर्क
Cell 9284695583



## संपादकीय....

### बाजाराला नवसंजीवनी

सणांत आनंद असतोच. पण, सणाआधीच सणाचा आनंद देण्याची किमया केंद्र सरकारच्या जीएसटी संदर्भातील सुधारणांनी केली आहे. बाजारात त्यामुळे सध्या 'फील गुड' वातावरण आहे. 'फील गुड' म्हणण्याचं कारण एवढंच, की या सुधारणा २२ सप्टेंबरपासून अमलात येणार आहेत. सुधारणा प्रत्यक्षात अमलात यायला आणखी १५ दिवसांचा अवधी असला, तरी त्याची सविस्तर घोषणा आधीच झाली असल्यामुळे उत्पादक, विक्रेते आणि ग्राहकांनाही या सुधारणा गृहीत धरून तयारी करायला पुरेसा वेळ मिळणार आहे. भारतीय संस्कृतीत सण वर्षभर असले, तरी 'दिवाळी हा सर्व सणांचा राजा' असं म्हटलं जातं. दिवाळीनिमित्ताने बाजारात होणारी उलाढाल, खेळणारा पैसा हा वर्षातल्या अन्य कुठल्याही काळापेक्षा कितीतरी अधिक असतो. ग्राहकांची मागणी लक्षात घेऊन त्यासाठी नवरात्रीपासूनच बाजार फुललेला असतो. मालाचा भरपूर पुरवठा असतो. जीएसटीतील सुधारणांमुळे जीवनावश्यक घरगुती उपयोगाच्या किंवा वाहनांसारख्या सणासुदीला खरेदी होणाऱ्या वस्तूंच्या किमती कमी होणार असल्याने त्याची मागणी यावेळी कितीतरी वाढेल, असा अंदाज आहे. ही मागणी पूर्ण करण्यासाठी पुरवठा; म्हणजे उत्पादन वाढेल आणि त्या उत्पादनासाठी रोजगाराची मागणी वाढणं अपरिहार्य आहे. त्यामुळे, केवळ किमतीतील घटच नाही, रोजगाराच्या मागणीत वाढ झाल्यामुळेही अर्थचक्राला चांगली गती येईल. त्यामुळे, यावर्षी आनंदी आनंद कांकणभर जास्तच असेल, असा अर्थतज्ज्ञांचा अंदाज आहे. करप्रणालीमध्ये एकसूत्रता आणण्यासाठी देशाला जीएसटी सारखी करप्रणाली आवश्यकच होती. त्यामुळे जुलै २०१७ मध्ये जेव्हा ती लागू झाली, तेव्हा तिचं बहुशः स्वागतच झालं. त्यातल्या तपशिलाबाबत मात्र अनेक तक्रारी होत्या. करपात्र बाबींचं वर्गीकरण करताना केलेल्या पाच श्रेणी हे टीकेमागचं पहिलं कारण होतं. दुसरी तक्रार होती, ती वस्तूंच्या वर्गीकरणाबाबत. चपाती आणि पराठा यांना वेगवेगळ्या श्रेणीतून वेगवेगळे कर लावण्यात आले होते. तयार मालावरचा कर अनेक बाबतीत त्याला लागणाऱ्या कच्च्या मालापेक्षा कमी होता! महिलांनी मासिक पाळीच्या काळात वापरायच्या पॅडचा प्रसार होणं, त्याचा वापर तळातल्या आर्थिक स्तरातही होणं महिलांच्या आरोग्याच्यादृष्टीने आवश्यक असल्याने त्यावर कमीत कमी कर असणं योग्यच होतं. पण, या पॅडसाठी लागणाऱ्या कच्च्या मालावर पॅडपेक्षा जास्त कर लावल्याने हेतू कसा साध्य होणार होता? हा प्रश्न होता. कपड्यांच्या बाबतीतही तसंच. सुती धाग्यावर १८ टक्के, कृत्रिम धाग्यावर १२ टक्के, तर तयार कपड्यांवर ५ टक्के कर होता. असं अनेक बाबतीत होतं. खाण्याचे पदार्थ, आयुर्वेदिक औषधं सुटी विकली, तर कर कमी; पण तीच पॅकबंद करून विकली, तर कर जास्त! अशा अनेक अर्थशून्य तरतुदी जुन्या पद्धतीत होत्या. संबंधित उत्पादक आणि विक्रेते त्या विरोधात सतत तक्रारी करत होते. पण, त्याची दखल घेतली गेली नाही. जीएसटीच्या धोरणात आणि आकार पद्धतीत आमूलाग्र सुधारणा करताना त्याचा विचार झाला याबद्दल म्हणूनच आता समाधान व्यक्त होतं आहे. कर भरण्याची प्रक्रिया आणि परताव्याची मागणी यातही सुरुवातीला खूपच क्लिष्टता होती. परताव्याच्या मागण्या कितीतरी महिने तशाच पडून राहत होत्या. उलट, करभरणा करण्यास काही तासांचा विलंब झाला, तरी कर विभागाच्या नोटिसा येऊन धडकत होत्या. देशातला उत्पादक किंवा व्यापारी जमाखर्च किंवा ताळेबंदाचा तज्ज्ञ नाही. त्याची सगळी शक्ती व्यापाराचं व्यवस्थापन आणि वृद्धीसाठी लागलेली असते. त्यामुळे, कर भरण्याची तांत्रिकता, त्यासाठी आवश्यक संगणकीय ज्ञानाची गरज याने तो पुरता त्रस्त झाला होता. जीएसटी प्रणाली ही सरकार किंवा व्यापाऱ्यांपेक्षा सनदी लेखापालांच्याच हिताची आहे अशी टीका त्यामुळेच झाली होती. पण, सर्व्हरबाबतच्या अडचणी, सतत बदलणारे नियम यामुळे खरं तर सनदी लेखापालही मेटाकुटीला आले होते. जीएसटी ०.२ ने याबाबतीत किती सुलभता आणली आहे, हे अद्याप स्पष्ट नाही. पण, सरकारच्यावतीने केल्या गेलेल्या निवेदनाचा सूर पाहता याबाबतच्या आवश्यक सुधारणाही केल्या असतील, अशी आशा आहे. कर आकारणी, कर भरणा आणि कर विभागाकडून होणारी तपासणी यात तफावत आली, तर दाद कुठे मागायची? हाही प्रश्न होता. विशेषतः राष्ट्रीय पातळीवर. राज्या-राज्यांतील करांच्या दरफरकातील त्रास मोठ्या उत्पादकांना सहन करावा लागत होता. २०२५ च्या अखेरीपर्यंत राष्ट्रीय पातळीवर अशा अपिलीय न्यायाधीकरणाचं कार्यान्वयन करण्याचं आश्वासन त्यादृष्टीने खूपच महत्त्वाचं ठरणार आहे. बहुतांश जीवनावश्यक बाबींच्या करश्रेणीत बदल होणार असल्याने कर घटणार आहेत. परिणामी सरकारच्या उत्पन्नातही घट होणार आहे. अर्थ विभागाच्या अंदाजानुसार सुरुवातीला ही घट सुमारे ४७ हजार कोटी रुपयांची असेल. भारताच्या अर्थव्यवस्थेचा एकूण आकार बघता ही घट अगदी किरकोळ आहे. दुसरं, कर कमी झाल्याने खरेदी-विक्रीत जी वाढ होईल आणि वाढत्या उलाढालीने जे अधिक कर उत्पन्न मिळेल, त्यात ही घट भरून निघेल, असाही अर्थ विभागाचाच विश्वास आहे. विरोधी पक्षांची सरकारं असलेल्या राज्यांनी आर्थिक वर्षाच्या अधेमधे केलेल्या या कर कपातीबद्दल नाराजी व्यक्त केली आहे. विद्यमान दराने कर उत्पन्न गृहीत धरून राज्यांनी आपले अर्थसंकल्प बेतले असल्याने त्यांचं सगळंच गणित बिघडेल, अशी तक्रार आहे. पण, वाढत्या व्यवहारांचा फायदा त्यांनाही मिळेलच. घट फार राहणार नाही. बाजाराला नवसंजीवनी देण्यासाठी सरकारने त्यांचं कर्तव्य केलं आहे. पुढची जबाबदारी आता उत्पादक आणि विक्रेत्यांची आहे. कर कपातीचा फायदा त्यांनी ग्राहकाला दिला पाहिजे. ग्राहकांचा संतोष हाच आमचा फायदा हे ब्रीद तेव्हांच खरं होईल.

१३

## मुख्याधिकारी सेलू नगरपरिषद, जि. परभणी यांजकडून महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५ कलम ३ अन्वये नगरपालिका (य) वर्ग ने जाहीर करण्याचा लोकसेवेचा तपशील

### अधिसूचना

**क्रमांक नपा/कावि/साप्रशा-२४६३-२०२५**

''महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५ चा महाराष्ट्र, अध्यादेश क्र. ५ च्या कलम ३ (१) अन्वये मला प्राप्त अधिकारानुसार भी मुख्याधिकारी, नगरपरिषद सेलू जि. परभणी याद्वारे उक्त अध्यादेशाच्या प्रयोजनार्थ सेलू नगर परिषदेकडून पुरविण्यात येत असलेल्या विभागनिहाय लोकसेवा, नियत कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम आणि द्वितीय अपिलीय प्राधिकारी या बाबी खालील नमूद केल्याप्रमाणे अधिसूचित करीत आहेः-

**परिशिष्ट**

| अ.क्र. | १. लोकसेवांची सूची | आवश्यक कागदपत्रे | फी | नियत कालमर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी | द्वितीय अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | जन्म प्रमाणपत्र देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. वाळाच्या आई-वडिलांचे आधार कार्ड<br>३. दवाखान्यातील जन्मखवर (असल्यास) छायाप्रत<br>४. पालका ऐवजी इतर नाते वाईक असतील तर पालकांची समत्तीपत्र | नगर परिषद स्तरावर निश्चित केले दर | ३ दिवस | जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ अन्वये प्राधिकृत अधिकारी (संबंधीत विभाग प्रमुख) | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| २ | मृत्यू प्रमाणपत्र देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. दवाखान्यात मुत्यू झाला असल्यास नगुना नं.४<br>३. घरी मुत्यू झाला असल्यास नमुना नं. A<br>४. अर्जदार व मृतक व त्याचे नातेवाईकांचे आधारकार्ड झेरॉक्स | नगर परिषद स्तरावर निश्चित केले दर | ३ दिवस | जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ अन्वये प्राधिकृत अधिकारी (संबंधित विभाग प्रमुख) | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ३ | विवाह नोंदणी प्रमाणपत्र | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. वास्तव्याचा पुरावा<br>३. वयाचा पुरावा<br>४. विवाहसाठी उपस्थित साक्षीदारांचे स्वयंघोषणापत्र<br>५. ९० दिवसानंतर नोंदणी असल्यास स्वयंघोषणापत्र | नगर परिषद स्तरावर निश्चित केले दर | ३ दिवस | विवाह नोंदणी अधिनियम १९९८ अन्वये प्राविकृत अधिकारी (संबंधित विभाग प्रमुख) | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ४ | मालमत्ता कर उतारा देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. संकलित कर व पाणीपट्टी कर भरणा केलेल्या पावतीची छायांकित प्रत. | नगर परिषद स्तरावर निश्चित केले दर | ३ दिवस | कर निरीक्षक | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ५ | थकबाकी नसल्याचा दाखला | १. विहित नमुन्यातील अर्ज | नगर परिषद स्तरावर निश्चित केले दर | ३ दिवस | कर निरीक्षक | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ६ | अ) दस्त ऐवजांच्या आधारे मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे. | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला<br>३. दस्तऐवजाची प्रत (खरेदीखत/ बक्षीसपत्र/ वाटणीपत्र व इतर) | नगर परिषद स्तरावर निश्चित केले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
|  | ब) वारसा हक्काने मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे. | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला<br>३. मा. कोर्ट आदेश, ७/१२ सिटी सर्वे उतारा व इतर यापैकी एक | नगर परिषद स्तरावर निश्चित केले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ७ | झोन दाखला | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. ७/१२, सिटी सर्वे उतारा<br>३. मोजणी नकाशा / सिटी सर्वे उतारा | नगर परिषद स्तरावर निश्चित केले दर | ७ दिवस | सहा. नगररचनाकार | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ८ | भाग नकाशा देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. ७/१२, सिटी सर्वे उतारा<br>३. मोजणी नकाशा / सिटी सर्वे उतारा | नगर परिषद स्तरावर निश्चित केले दर | ३ दिवस | सहा. नगररचनाकार | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ९ | बांधकाम परवानगी देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. वास्तूविशारदाचा दाखला<br>३. मालकी हक्काची कागदपत्रे<br>४. बांधकाम आराखडा नकाशा ५ प्रती ५. मोजणी नकाशा<br>६. मंजूर रेखांकनातील प्रत | नगर परिषद स्तरावर निश्चित केले दर | ६० दिवस | सहा. नगररचनाकार | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| १० | जोते प्रमाणपत्र | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र | नगर परिषद स्तरावर निश्चित केले दर | १५ दिवस | सहा. नगररचनाकार | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ११ | भोगवटदार प्रमाणपत्र देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र<br>३. जोते प्रमाणपत्र | नगर परिषद स्तरावर निश्चित केले दर | ३० दिवस | सहा. नगररचनाकार | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| १२ | नळ जोडणी देगे | ४. घर मालक/वास्तूविशारद यांचे पुर्णत्वाचे स्वयंघोषणापत्र | नगर परिषद स्तरावर निश्चित केले दर | १५ दिवस | सहा. नगररचनाकार | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| १३ | जल नित्सारण जोडणी देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. जागा मालकी कागदपत्रे<br>३. थकबाकी नसल्याचा दाखला | नगर परिषद स्तरावर निश्चित केले दर | १५ दिवरा | पाणी पुरवठा विभाग प्रमुख | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| १४ | नव्याने कर आकारणी | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. जागा मालकी कागदपत्रे | नगर परिषद स्तरावर निश्चित केले दर | १५ दिवस | पाणी पुरवठा अभियंता | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| १५ | पुनःकर आकारणी | १. विहित नमुन्यातील अर्ज | नगर परिषद स्तरावर निश्चित केले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| १६ | कराची मागणी पत्र तयार करणे | १. विहित नमुन्यातील अर्ज | नगर परिषद स्तरावर निश्चित केले दर | ३ दिवस | कर निरीक्षक | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| १७ | कर माफी मिळणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला | नगर परिषद स्तरावर निश्चित केले दर | ७ दिवस | कर निरीक्षक | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| १८ | रहिवासी नसलेल्या मालमत्तांना करात सूट मिळणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला | नगर परिषद स्तरावर निश्चित केले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| १९ | मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे/ इतर मार्गाने | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला<br>३. मालकी हक्काची कागदपत्रे / नोंदणीकृत, खरेदीखत | नगर परिषद स्तरावर निश्चित केले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| २० | स्वयंमुल्यांकन | १. विहित नमुन्यातील अर्ज | . नगर परिषद स्तरावर निश्चित केले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| २१ | आक्षेप नोंदविणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला | नगर परिषद स्तरावर निश्चित केले दर | कर निरीक्षक | १५ दिवस | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| २२ | उपविभागामध्ये मालमत्ता विभाजन | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला<br>३. गालकी हक्काची कागदपत्रे/नोंदणीकृत, वाटणीपत्र, बक्षीसपत्र इ.) | नगर परिषद स्तरावर निश्चित केले दर | कर निरीक्षक | १५ दिवस | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| २३ | मालमत्ता पाडणे व पुनः बांधणी कर आकारणी | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला | नगर परिषद स्तरावर निश्चित केले दर | कर निरीक्षक | १५ दिवस | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| २४ | नवीन नळ जोडणी | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला<br>३. मालकी हक्क कागदपत्रे | नगर परिषद स्तरावर निश्चित केले दर | पाणी पुरवठा अभियंता | १५ दिवस | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| २५ | ५ मालकी हक्कात बदल करणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला<br>३. मालकी हक्क कागदपत्रे | नगर परिषद स्तरावर निश्चित केले दर | पाणी पुरवठा अभियंता | ७ दिवस | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| २६ | १६ नळ जोडणी आकारामध्ये बदल करणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. मालकी हक्क कागदपत्रे | नगर परिषद स्तरावर निश्चित केले दर | पाणी पुरवठा अभियंता | १५ दिवस | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| २७ | तात्पुरते / कायमस्वरुपी नळ जोडणी खंडित करणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला | नगर परिषद स्तरावर. निश्चित केले दर | पाणी पुरवठा अभियंता | ७ दिवस | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| २८ | २८ पुनः जोडणी करणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला | नगर परिषद स्तरावर निश्चित केले दर | पाणी पुरवठा अभियंता | १५ दिवस | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| २९ | वापरामध्ये बदल करणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला | नगर परिषद स्तरावर निश्चित केले दर | पाणी पुरवठा अभियंता | १५ दिवस | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |

# सह्याद्रीच्या हृदयातील अभेद्य गड : प्रतापगड



सह्याद्रीच्या उंचसखल डोंगररांगांमध्ये, दाट जंगलांच्या कुशीत आणि नागमोडी घाटांच्या वळणावर अभिमानाने उभा असलेला प्रतापगड हा मराठा इतिहासातील एक सोनेरी पान आहे. या गडाचे सामरिक महत्त्व केवळ त्याच्या उंचसखल भौगोलिक रचनेत नाही, तर आजूबाजूच्या दऱ्या, खोऱ्या आणि घाटांवर ठेवलेल्या नियंत्रणातही दडलेले आहे. महाराष्ट्रातील एक प्रसिद्ध डोंगरी किल्ला म्हणून या किल्ल्याची ओळख आहे. सातारा जिल्ह्यातील जावळी तालुक्यात महाबळेश्वरच्या नैर्ऋत्येस १३ कि.मी. वर हा किल्ला असून त्याची समुद्रसपाटीपासून उंची १,०९२ मी. आहे. पूर्वेकडील बाजूस ३४० मी. आणि पश्चिमेकडे ८७० मी. खोल दरी आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी जावळी खोरे जिंकल्यानंतर मोरो त्रिंबक पिंगळे यांना १६५६ मध्ये हा किल्ला बांधून घेण्याची आज्ञा दिली.

प्रतापगड हा बालेकिल्ला आणि त्याच्या सभोवतालचा खालचा भाग, अशा दोन प्रमुख भागात विभागलेला आहे. डोंगराच्या शिखरावर असलेल्या बालेकिल्ल्यात राजवाडा, सदर, केदारेश्वर मंदिरे, पाण्याच्या टाक्या आणि धान्य–रसद साठवणीसाठीच्या कोठाऱ्या यांसारखी महत्त्वाची बांधकामे होती. तर दक्षिण व पूर्व उतारावर बांधलेल्या खालच्या भागात पहिली तटबंदी आणि प्रचंड बुरुज शत्रूला दरीतच अडकवून ठेवण्यासाठी होती.

मुख्य किल्ला, माची आणि बालेकिल्ला असे या किल्ल्याचे तीन भाग होतात. मुख्य किल्ला व बालेकिल्ला भागांत तलाव असून संरक्षणाच्या दृष्टीने किल्ल्याच्या चोहोबाजूंस भक्कम तटबंदी व बुरूज आहेत. बालेकिल्ल्याचे क्षेत्रफळ ३,६६० चौ. मी., तर मुख्य किल्ल्याचे ३,८८५ चौ. मी असून दक्षिणेकडील बुरूज १० ते १५ मी. उंचीचे आहेत. त्यांपैकी रेडका, राजपहारा, केदार इ. बुरुजांचे अवशेष टिकून आहेत. बुरूज वैशिष्ट्यपूर्ण असून निमुळत्या डोंगर धारेच्या शेवटी आहे. या भागाला माची म्हणतात. कारण अशाच स्वरूपाचे बांधकाम राजगड (सुवेळा व संजीवनी), तोरणा ( झुंजार) या किल्ल्यांवरील माच्यांना आहे. किल्ल्याची तटबंदी काही ठिकाणी तब्बल ४० फूट उंच असून तिच्या भक्कम रचनेमुळे प्रतापगड अभेद्य बनला होता. संपूर्ण बांधकाम काळ्या पाषाणात केले गेले आहे. गडाच्या उंच बुरुजांवरून जावळीच्या खोऱ्यातील डोंगर–दऱ्यांवर सतत नजर ठेवता येत असे, त्यामुळे शत्रूच्या हालचाली वेळेत ओळखणे सोपे होत असे.

मुख्य किल्ल्यात प्रवेश करण्यासाठी दोन दरवाजे पार करून जावे लागते. दोन्ही दरवाजांवर शरभाच्या प्रतिमा दिसतात. दोन दरवाजे पार केल्यावर तुळजा भवानीचे मंदिर आहे. या देवालयासमोर दोन उंच दीपमाळा आहेत. त्या जवळच नगारखान्याची इमारत आहे. भवानी देवीचे मूळ मंदिर दगडी गाभाऱ्याचे होते. १८२० मध्ये साताऱ्च्या प्रतापसिंह महाराजांनी तेथे लाकडी मंडप बांधला.

अरुंद, नागमोडी चढणाऱ्या वाटा आणि दारांच्या पुढे लपवलेले मजबूत अडथळे यामुळे कुणालाही सरळपणे गडावर प्रवेश करणे शक्य नव्हते. महादरवाजा तर संरक्षणकलेचा उत्कृष्ट नमुना मानला जातो. गोमुखी शैलीत बांधलेला हा दरवाजा रचनेत इतका कुशल होता की, अरुंद मार्गाने आत येणाऱ्या शत्रूंना दोन्ही बाजूंच्या बुरुजांतून सहज हल्ल्याच्या टप्प्यात आणले जाई.

प्रतापगडाचे एक अनोखे वैशिष्ट्य म्हणजे त्याची सुसंरचित जलव्यवस्था. किल्ल्यावर चार प्रमुख पाण्याच्या टाक्या आहेत. यापैकी दोन बालेकिल्ल्यात तर दोन खालच्या भागात आहेत. पावसाचे पाणी साठवण्यासाठी नैसर्गिक उतारांचा कुशलतेने वापर करण्यात आला होता. त्यामुळे गडावरील लोकसंख्येला वर्षभर पुरेल इतका पाणीपुरवठा व्हायचा. ही योजना मराठ्यांच्या अभियांत्रिकी व व्यूहनीती कौशल्याचा अद्वितीय नमुना ठरते.

प्रतापगडचे ऐतिहासिक महत्त्व अफझलखान छत्रपती शिवाजी महाराज भेट व त्याप्रसंगी झालेला अफझलखानाचा वध या घटनेमुळे वाढले (१६५९). छत्रपती राजाराम महाराज सुद्धा जिंजीस जात असताना प्रथम प्रतापगडास आले. स्वातंत्र्योत्तर काळात या किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य अश्वारूढ पुतळा उभारण्यात आला. त्याचे अनावरण १९५७ च्या नोव्हेंबर महिन्यात तत्कालीन पंतप्रधान पं.जवाहरलाल नेहरू यांनी केले.

आजही हजारो लोक केवळ त्या क्षणाशी नाते जोडण्यासाठी प्रतापगडावर भेट देतात. गडावर दरवर्षी शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. अफझलखान भेटीचे नाट्यरूप सादरीकरण, सांस्कृतिक कार्यक्रम आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनाशी निगडित उपक्रम यामुळे प्रतापगड महाराष्ट्राच्या अस्मिता आणि सांस्कृतिक एकतेचे केंद्र ठरतो.

प्रतापगड मराठ्यांच्या धैर्य, रणनीती आणि स्वराज्याच्या स्वप्नाचा जिवंत साक्षीदार आहे. सह्याद्रीच्या कुशीत उभा असलेला हा गड आजही भूतकाळ आणि वर्तमान यांना जोडणारा एक अढळ दुवा आहे.

युनेस्कोने छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांना जागतिक वारसा मानंकन दिले असून त्यात प्रतापगडाला विशेष स्थान मिळाले आहे. त्यामुळे प्रतापगड आज केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित न राहता जगाच्या सांस्कृतिक वारशाचा एक अनमोल ठेवा म्हणून गौरवला जातो.

–संजय डी.ओरके
विभागीय संपर्क अधिकारी,
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.

| अ.क्र. | १. लोकसेवांची सूची | आवश्यक कागदपत्रे | फी | नियत कालमर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी | द्वितीय अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३० | पाणी देयक तयार करणे | १. आवश्यकतेनुसार | नगर परिषद स्तरावर निश्चित केले दर | ३ दिवस | कर निरिक्षक | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ३१ | प्लंबर परवाना | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला | नगर परिषद स्तरावर निश्चित केले दर | १५ दिवस. | पाणी पुरवठा अभियंता | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ३२ | प्लंबर परवाना नुतनीकरा करणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. शैक्षणिक अर्हतेबाबतचे प्रमाणपत्र<br>३. थकबाकी नसल्याचा दाखला | नगर परिषद स्तरावर निश्चित केले दर | १५ दिवस | पाणी पुरवठा अभियंता | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ३३ | थकबाकी नसल्याचा दाखला नादुरुस्त मीटर तक्रार करणे | विहित नमुन्यातील अर्ज | नगर परिषद स्तरावर निश्चित केले दर | ३ दिवस | कर निरीक्षक | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ३४ | नादुरुस्त मीटर तक्रार करणे | १. विहित नमुन्यातील अर्ज | नगर परिषद स्तरावर निश्चित केले दर | ७ दिवस | पाणी पुरवठा अभियंता | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ३५ | अनाधिकृत नळ जोडणी तक्रार | विहित नमुन्यातील अर्ज | नगर परिषद स्तरावर निश्चित केले दर | ७ दिवस पाणी | पाणी पुरवठा अभियंता | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ३६ | पाण्याची दबाव क्षमता तक्रार | विहित नमुन्यातील अर्ज | नगर परिषद स्तरावर निश्चित केले दर | ७ दिवस पाणी | पाणी पुरवठा अभियंता | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ३७ | पाण्याची गुणवत्ता तक्रार | १. विहित नमुन्यातील अर्ज | नगर परिषद स्तरावर निश्चित केले दर | ३ दिवस पाणी | पाणी पुरवठा अभियंता | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ३८ | व्यापार/व्यवसाय/साठा करणेसाठी नाहरकत प्रमाणपत्र | १. योग्य प्रकारे भरलेले अर्ज<br>२. रस्ता पुनःस्थापन करार | नगर परिषद स्तरावर निश्चित केले दर | ७ दिवस | कर निरीक्षक | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ३९ | मंडपासाठी नाहरकत प्रमाणपत्र | १. योग्य प्रकारे भरलेले अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगर परिषद स्तरावर : निश्चित केले दर | ७ दिवस | कर निरीक्षक | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ४० | नवीन परवाना मिळणे | १. योग्य प्रकारे भरलेले अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगर परिषद स्तरावर निश्चित केले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ४१ | परवान्याचे नुतनीकरण | १. योग्य प्रकारे भरलेले अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगर परिषद स्तरावर निश्चित केले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ४२ | परवाना हस्तांतरण | १. योग्य प्रकारे भरलेले अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगर परिषद स्तरावर निश्चित केले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ४३ | परवाना दुय्यम प्रत | १. योग्य प्रकारे भरलेले अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगर परिषद स्तरावर निश्चित केले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ४४ | व्यवसायाचे नाव बदलणे | १. योग्य प्रकारे मरलेले अर्ज<br>२. कोणतीही थकवाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगर परिषद स्तरावर निश्चित केले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ४५ | व्यवसाय बदलणे | १. योग्य प्रकारे भरलेले अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगर परिषद स्तरावर निश्चित केले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ४६ | परवाना / धारक भागीदाराचे नाव / बदलणे | १. योग्य प्रकारे भरलेले अर्ज | नगर परिषद स्तरावर निश्चित केले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ४७ | भागीदाराच्या संख्येत बदल (वाढ/कमी) | १. योग्य प्रकारे भरलेले अर्ज | नगर परिषद स्तरावर निश्चित केले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ४८ | परवाना रद्द करणे | १. योग्य प्रकार भरलल अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगर परिषद स्तरावर निश्चित केले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ४९ | कालबाह्य परवानासाठी नुतनीकरण सूचना | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगर परिषद स्तरावर निश्चित कैले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ५० | जाहिरात परवाना। आकार चिन्ह परदाना (Signature License ) नवीन परवाना | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगर परिषद स्तरावर निश्चित केले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ५१ | सिनेमा चित्रीकरण परवाना (Movie shooting License ) नवीन परवाना | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगर परिषद स्तरावर निश्चित केले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ५२ | व्यवसाय परवाना स्वयंनुतनीकरण (Auto Renewal of Trade License ) | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगर परिषद स्तरावर निश्चित केले दर | | | | |
| ५३ | मोबाईल टॉवर परवाना (Mobile Tower Approval Ground Base Tower & Roof Top Tower ) | १. विहित नमुन्यातील अर्ज २. माहिती तंत्रज्ञान यांनी दिलेला परवाना ३. संबंधित इमारतीच्या मालकी हक्काचा पुरावा ४. वैध भाडेकरारनामा ५. स्थळाचा नकाशा (१:१०००) ६. ज्या इमारतीवर टॉवर उभारायचा आहे त्याचा वैध भोगवटा प्रमाणपत्र ७. संबंधित इमारतीच्या/जमीनीच्या मालकाचे ना हरकत प्रमाणपत्र ८. सक्षम प्राधिकारी यांचे अग्निशमन ना–हरकत दाखला ९. सक्षम प्राधिकारी यांचे संरचनात्मक स्थिरता प्रमाणपत्र १०. पर्यावरण विभागाची ना–हरकत ११. संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे ना– देय प्रमाणपत्र १२. शासन वेळोवेळी निश्चित करेल असे इतर आवश्यक परवाने / दस्ताऐवज | शासनाने विहित केलेले व नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ६० दिवस | सहा. नगर रचनाकार | अतिरिक्त मुख्याधिकारी/ उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ५४ | रस्ता खोदाई परवाना देणे (To Grant road cutting permission) नवीन परवाना व नुतनीकरण | १. विहित नमुन्यातील अर्ज २. कोणताही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र ३. शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | नगर परिषद स्तरावर निश्चित केले दर | ३० दिवस | नगर अभियंता (स्थापत्य) | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ५५ | राज्याच्या खाद्य परवान्याकरीता नागरी स्वराज्य संस्थेचे ना–हरकत प्रमाणपत्र देणे (To issue NOC from Municipality or other Local body for state License for food Business ) | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र<br>३. ज्या इमारतीत सदर आस्थापना / कारखाना होणार आहे त्या इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र आणि सदरच्या मालकी हक्काबाबतची कागदपत्रे<br>४. शासनाद्वारे, वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | नगर परिषद स्तरावर निश्चित केले दर | ३० दिवस | स्वच्छता निरीक्षक | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ५६ | खाद्य नोंदणी प्रमाणपत्राकरीता नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे आरोग्य विषयक ना–हरकत प्रमाणपत्र देणे (To issue Health NOC by Municipality/ Panchyat for Food REgistration Certificate) | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र<br>३. ज्या इमारतीत सदर आस्थापना / कारखाना होणार आहे त्या इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र आणि सदरच्या मालकी हक्काबाबतची कागदपत्रे<br>४. शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३० दिवस | स्वच्छता निरीक्षक | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ५७ | पाणी उपसा करणेसाठी केंद्रीय भुजल सर्वेक्षण विभाग (अथवा इतर संबंधीत विभाग) यांचे ना हरकत प्रमाणपत्र करिता नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे पाणी अनुपालनब्धता प्रमाणपत्र देणे. | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र ३. ना–हरकत प्रमाणपत्र दिल्यानंतर भोगवटा प्रमाणपत्र घेणे बाबतचेच पर्जन्य जल पुनर्भरण करणे दाबतचे प्रतिज्ञापत्र<br>४. शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३० दिवस | पाणी पुरवठा अभियंता | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ५८ | लॉजिग हाऊस परवाना देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | शासनाचे सूचनानुसार स्थानिक स्तरावर निश्चित केलेले शुल्क | ३० दिवस | मुख्याधिकारी | संबंधित जिल्ह्यांचे जिल्हासह आयुक्त (नगरपरिषद प्रशासन) | संबंधित विभागाचे विभागीय सह आयुक्त (नगरपरिषद प्रशासन) |
| ५९ | लॉजीक हाऊस परवान्याचे नुतनीकरण करणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | शासनाचे सूचनानुसार स्थानिक स्तरावर निश्चित केलेले शुल्क | ३० दिवस | मुख्याधिकारी | संबंधित जिल्ह्यांचे जिल्हासह आयुक्त (नगरपरिषद प्रशासन ) | संबंधित विभागाचे विभागीय सह आयुक्त (नगरपरिषद प्रशासन) |
| ६० | मंगल कार्यालय/ सभागृह वगैरे परवाना देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | शासनाचे सूचनानुसार स्थानिक स्तरावर निश्चित केलेले शुल्क | ३० दिवस | मुख्याधिकारी | संबंधित जिल्ह्यांचे जिल्हासह आयुक्त ( नगरपरिषद प्रशासन) | संबंधित विभागाचे विभागीय सह आयुक्त (नगर परिषद प्रशासन) |

## डॉ. राधा तांबे यांना आदर्श योग प्रशिक्षक पुरस्कार



सोनपेठ, प्रतिनिधी– श्रीमती डॉ. राधा सचिन तांबे गेल्या सहा वर्षांपासून योग क्षेत्रात कार्यरत असून त्यांनी समाजासाठी अमूल्य योगदान दिले आहे. त्यांनी योग शिबिरांचे आयोजन करून अनेक महिला तसेच वृद्धांना आजारमुक्त, निरोगी व आनंदी जीवन जगण्याची प्रेरणा दिली आहे.त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने 'आदर्श योग प्रशिक्षक पुरस्कार' प्रदान करण्यात आला आहे

तांबे यांनी आंतरराष्ट्रीय योग स्पर्धांमध्ये नेपाळ, थायलंड आणि व्हिएतनाम येथे सुवर्णपदके मिळवून देशाचा आणि राज्याचा मान उंचावला आहे.एम ए योगशास्त्र पदव्युत्तर शिक्षण घेऊन त्या बीड येथे योगा सेंटर चालवतात. सध्या त्या चराठा प्राथमिक आरोग्य केंद्रात योग प्रशिक्षण देत आहेत. उत्कृष्ट योग शिबिरांच्या माध्यमातून त्या रुग्णांना आरोग्यदायी जीवन जगण्यास मदत करत आहे.

## गंगाखेडातील एका हॉटेल मालकाविरुध्द पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल : वेश्या व्यवसायास महिलेस प्रवृत्त केल्याचे कारण

परभणी,दि.०४(प्रतिनिधी) : गंगाखेड ते परळी या रस्त्यावरील एका हॉटेलमालकाविरोधात गंगाखेड पोलिसांनी वेश्या व्यवसायास महिलेस प्रवृत्त केल्याबद्दल गुन्हा दाखल केला.

गंगाखेड पोलिसांनी परळी रस्त्यावरील हॉटेल निसर्गवर एक बनावट ग्राहक पाठवून वेश्या व्यवसाय सुरु असल्याची खातरजमा केली. पाठोपाठ बुधवारी सायंकाळी ४ वाजेच्या सुमारास छापा टाकला व त्या हॉटेलमधील एका खोलीत भंडारा येथील ३२ वर्षीय महिलेस ताब्यात घेतले. तीला वेश्या व्यवसाय केला तर जास्त पैसे मिळतात, असे सांगून हॉटेल मालक केशव लक्ष्मण मुंढे (वय ३८, र. झोला) यांनी त्या महिलेचे मनपरिवर्तन करुन तीला वेश्या व्यवसायास प्रवृत्त केल्याचे निदर्शनास आले. पोलिस निरीक्षक श्रीकांत डोंगरे, सहाय्यक पोलिस निरीक्षक दिपाली गिते, सहाय्य पोलिस निरीक्षक शिवाजी सिंगणवाड, सहाय्यक पोलिस निरीक्षक आदित्य लोणीकर, पोलिस उपनिरीक्षक व्यंकट गंगलवाड, पोलिस उपनिरीक्षक राहुल लोखंडे, दत्तराव चव्हाण, परसराम परचेवाड, राहुल खाडे यांच्या पथकाने ही कारवाई केली व हॉटेल मालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

## फळा येथे एक गाव एक गणपतीची आरती, गणेशराव रोकडे (दादा) यांच्या हस्ते, मराठा बांधवाचा सत्कार संपन्न



पालम (वा) पालम तालुक्यातील श्री क्षेत्र फळा येथे एक गाव एक गणपतीची स्थापना करण्यात आली आसुन या गणपतीची आरती गणेशराव रोकडे दादा (मा.कृषी सभापती परभणी तसेच संचालक जि.म.सह.बँक परभणी) यांच्या हस्ते करण्यात आली.

यावेळी डॉ. रामराव उंदरे (सभापती),पौळ सर (मु. अ. माखणी) तुकाराम महाराज पौळ मा सरपंच, व्यंकटराव पौळ, मा. उपसरपंच अंगद पौळ सरपंच गणेश रानडे, विठ्ठल महाराज पुरी, मनोहर पौळ, निवृत्ती पौळ, माधव पौळ,संभाजी पौळ, भागवत महाराज पौळ, सतीश पौळ अध्यक्ष अक्षय ढवळे, किशन पौळ, सुग्रीव पौळ गोविंद पौळ, खंडू रानडे, आकाश रानडे,कैलास रानडे हे होते तसेच श्री क्षेत्र फळा येथील मराठा आरक्षणाच्या आंदोलनात विजयी झालेल्या बांधवाचा फळा येथे गणेशराव रोकडे (दादा) यांच्या हस्ते मराठा बांधवाचा सत्कार करण्यात आला.

## पालम येथे पांडुरंग रुद्रवार यांचा सेवापूर्ती सोहळा सपंन्न

पालम – येथे श्री.पांडुरंग सुधाकरराव रुद्रवार (उच्चश्रेणी मुख्याध्यापक प्रा.शा.सातेगाव तसेच केंद्रप्रमुख कें.प्रा.शा. पेठशिवणी) यांचा सेवापुत सोहळा पार पडला या वेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष गणेशराव रोकडे दादा (मा.कृषी सभापती परभणी तसेच संचालक जि.म.सह.बँक परभणी) व प्रमुख पाहुणे वसंतकाका सिरस्कर (मा.न.अध्यक्ष न.पं. पालम) जिय्याखान पठाण (नागराध्यक्ष न पं.पालम) पोलास साहेब (शिक्षणाधिकारी परभणी प्रा) रामरावजी लोहट (सं.अ मा. रा.शि.स.परभणी) हे होते.

दादांनी पुष्पहार घालून रुद्रवार सरांना सेवापुतच्या शुभेच्छा दिल्या.यावेळी भास्करराव सिरस्कर (उपनगराध्यक्ष पालम) रामरावजी रोकडे (सेवानिवृत्त कें. मुख्याध्यापक) श्री.लक्ष्मणराव रोकडे अंकल (भाजपा प्र.कार्य.सदस्य तसेच नरसेवक पालम) विजय घोरपडे,शेफ चाऊस, कैलाश रूद्रवार,ईमदाद खा पठाण,जालिदर हात्तीअंबिरे, बालाजी आन्ना बरडे, रूपेश शिनगारे, गजानन गडम आदि सह प्रमुख मान्यवर मंडळी या सेवापुत कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

| अ.क्र. | १. लोकसेवांची सूची | आवश्यक कागदपत्रे | फी | नियत कालमर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी | द्वितीय अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ६१ | मंगल कार्यालय/सभागृह वगैरे परवान्याचे नुतनीकरण करणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | शासनाचे सूचनानुसार स्थानिक स्तरावर निश्चित केलेले शुल्क | ३० दिवस | मुख्याधिकारी | संबंधित जिल्ह्यांचे जिल्हासह आयुक्त (नगरपरिषद प्रशासन ) | संबंधित विभागाचे विभागीय सह आयुक्त (नगरपरिषद प्रशासन) |
| ६२ | फेरीवाले नोंदणी प्रमाणपत्र देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | शासनाचे सूचनानुसार स्थानिक स्तरावर निश्चित केलेले शुल्क | १५ दिवस | मुख्याधिकारी | संबंधित जिल्ह्यांचे जिल्हासह आयुक्त (नगरपरिषद प्रशासन) | संबंधित विभागाचे विभागीय सह आयुक्त (नगरपरिषद प्रशासन) |
| ६३ | भुमीगत दुर संचार वाहिनी (ऑप्टीकल फायबर केबल) टाकण्याकरीता परवानगी देणे (Permission for establishment of underground cable infrastructure (Optical fiber cable ) | विहित नमुन्यातील अर्ज<br>२. नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रं. संकीर्ण 2021/C.R.242/UD-20 दिनांक १९/१२/२०२२ मधी सुरपर आवश्यक कागदपत्रे<br>३. शासनाद्वारे वेळोवेळी निश्चित करेल असे इतर आवश्यक कागदपत्रे | नगर विकास विभाग शासन निर्णयक्रं. संकीर्ण 2021/C.R.242/ UD-20 दिनांक १९/१२/२०२२ मधील schedule IV नुसार स्थानिक स्तरावर निश्चित केलेले शुल्क | नगर विकारा विभाग शासन निर्णय क्रं. संकीर्ण २०२१/ ..२४२/-२० दिनांक १९/१२/२०२२ मधील तरतुदीनुसार ६० दिवस | मुख्याधिकारी | संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हास्तरीय दूरसंचार समिती | प्रधान सचिव, माहिती तंत्रज्ञान विभाग व अध्यक्ष राज्यस्तरीय दूरसंचार समिती |
| ६४ | महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) वृक्ष संरक्षण आणि संवर्धन अधिनियम १९७५ मधील कलम ८ मधील तरतुदीनुसार वृक्ष तोड परवानगी देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. शासन वेळोवेळी विहित करील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | स्थानिक स्तरावर विहित पध्दतीने गंजूर केलेले शुल्क | ४५ दिवस | संबंधित प्राधिकरणाचे वृक्ष अधिकारी | संबंधित नियोजन प्राधिकरणाचे मुख्याधिकारी | संबंधित नियोजन प्राधिकरणाकडील वृक्ष प्राधिकरण |
| ६५ | रस्त्यावरील खड्डे बुजविणे | १. पुराव्यासह अर्ज उदा. Geo tag केलेले फोटो इत्यादी | स्थानिक स्तरावर विहित पध्दतीने मंजूर केलेले शुल्क | ५ दिवस | नगर अभियंता (स्थापत्य) | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ६६ | गटावरील झाकणे सुस्थितीत ठेवणे | १. पुराव्यासह अर्ज उदा. Geo tag केलेले फोटो इत्यादी | स्थानिक स्तरावर विहित पध्दतीने मंजूर केलेले शुल्क | ५ दिवस | पाणी पुरवठा. जलनिस्सारण व आरोग्य अभियंता | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ६७ | शहरात स्वच्छता ठेवणे | १. पुराव्यासह अर्ज उदा. Geo tag केलेले फोटो इत्यादी | स्थानिक स्तरावर विहित पध्दतीने मंजूर केलेले शुल्क | १ दिवस | पाणी पुरवठा. जलनिस्सारण व आरोग्य अभियंता | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |

स्वाक्षरित/–
**तुकाराम कदम**
**मुख्याधिकारी**
सेलू नगर परिषद, सेलू

# वाल्मिकी अर्बन बँकेला मिळाला 'सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार

## मुख्य कार्यकारी अधिकारी बि.यु.बिडवे यांची माहीती

पाथरी : महाराष्ट्र अर्बन को–ऑपरेटिव्ह बँक्स फेडरेशनच्या वतीने दरवर्षी सहकारी नागरी बँकांच्या गुणवत्तापूर्ण कार्याचा गौरव करण्यासाठी 'सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार' प्रदान करण्यात येतो.या अनुषंगाने सहकार क्षेत्रातील प्रामाणिक व नाविन्यपूर्ण कार्याची दखल घेऊन पाथरी येथील वाल्मिकी अर्बन बँकेला 'सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार मिळाला आहे. याबाबतचे महाराष्ट्र फेडरेशन चे अध्यक्ष अजय ब्रम्हेचा यांचे पत्र ४ सप्टेंबर रोजी मिळाले आहे अशी माहीती वाल्मिकी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी बि.यु.बिडवे यांनी दिली आहे.

पाथरी येथील वाल्मिकी अर्बन को–ऑप. बँकेचे कुशल चेअरमन अनिलराव नखाते, संचालक मंडळ,सर्व कर्मचारी यांची यशस्वी कामगिरी, पारदर्शक कार्यपद्धती, ग्राहकाभिमुख धोरणे आणि सहकारभावना १०० कोटीपर्यंत च्या ठेवी याची महाराष्ट्र अर्बन को–ऑपरेटिव्ह बँक्स फेडरेशनने दखल घेत सन २०२४–२५ या वर्षासाठी युनिट बँका व १०० कोटीपर्यंत ठेवी असलेल्या बँका या गटातून वाल्मिकी अर्बन को–ऑप. बँक लि., पाथरी या बँकेस 'द्वितीय क्रमांकाचा सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार' जाहीर झाला आहे.या पुरस्काराचे वितरण समारंभ १३ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी २.३० वाजता नाशिक येथील 'श्री स्वामीनारायण कन्व्हेन्शन सेंटर, न्यू आडगाव नाका, मुंबई–आग्रा रोड, पंचवटी' येथे होणार असून यासाठी वाल्मिकी अर्बन बँकेचे चेअरमन व मान्यवर मंडळाने उपस्थित राहून सन्मान स्वीकारावा अशी विनंती या पत्रात केली आहे.फेडरेशनच्या परिवारातर्फे वाल्मिकी अर्बन को–ऑप. बँक प्रशासनाचे अभिनंदन केले आहे.

वाल्मिकी बँक स्थापनेपासून रिझर्व्ह बँकेच्या निर्देशाचे पालन करीत संगणकीकृत व्यवहार, मोबाईल बँकिंग, एटीएम सुविधा,व्यवहारातील पारदर्शकता,समांतर ठेवी व कर्जवाटप अशा पध्दतीने सुयोग्य नियोजन करीत बँकेने प्रगतीचा आलेख चढता ठेवला,यापूव बँकेला अनेक पुरस्काराने सन्मानित केले आहे. आता महाराष्ट्र फेडरेशनचा सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार सन्मान हा बँक लौकीकात भर टाकणारा आहे.चालू वर्षी बँकेच्या ठेवी १०० कोटी च्या वर झालेल्या असुन बँकेचा टायर दोन मध्ये समावेश झालेला आहे. यापुढे बँक आणखीन सर्वोत्तम पुरस्कारासाठी पात्र ठरेल असा विश्वास बँक प्रशासनाकडून व्यक्त केला आहे.

हे सर्व टिम वर्क चे यश : नखाते.

बैठकीच्या माध्यमातून संचालक मंडळाचा वेळोवेळी सुसंवाद ,तत्परसेवेसाठी बँक व्यवस्थापन,कर्मचारी आणि वसुली अधिकारी, सभासद, ग्राहक तसेच हितचिंतक या सर्वांच्या समन्वयाने बँकेला सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार मिळाला आहे.हा पुरस्कार बँकेला नवे चैतन्य व उर्जा प्रदान करणारा आहे.



हे यश सर्व टिम च्या परिश्रमाचे आहे.
अनिलराव नखाते
चेअरमन, वाल्मिकी अर्बन बँक पाथरी.

## भारतीय आयुर्विमा महामंडळ अडचणीच्या वेळी अत्यंत कमी वेळात आर्थिक मदत विमा धारकांना पुरवते: किरण देशपांडे



सेलू:(प्रतिनिधी)भारतीय आयुर्विमा महामंडळ सर्व विमा धारकांना आर्थिक आवश्यकता पूर्ण करते, अडचणीच्या वेळी अत्यंत कमी वेळात आर्थिक मदत पुरवते, सर्वात सुरक्षित गुंतवणुक भारतीय आयुर्विमा महामंडळ मध्य आहे,कारण आपल्या मागे सुध्दा पैसेआपल्या कुटुंबाला मिळण्याची खात्री फक्त आयुर्विमा महामंडळ देते त्यांचे विमा प्रतिनिधी सर्वात जास्त सुजनशील, संवेदनशील आणि सहकार्यशील असतात असे विचार किरण देशपांडे यांनी व्यक्त केले.

सेलू येथील भारतीय आयुर्विमा महामंडळाच्या ६९ व्या वर्धापन दिनानिमित्त सेलू शाखेच्या वतीने ०१ते ०४ सप्टेंबर या कालावधी मध्ये विमा सप्ताह साजरा करण्यात आला विमा सप्ताहाच्या निमित्ताने सेलू भारतीय आयुर्विमा महामंडळ शाखेच्या वतीने,विकास अधिकारी,विमा प्रतिनिधी व सी एल आय ए विमा प्रतिनिधींचा शाल व पुष्पगुच्छ देऊन प्रमुख पाहुणे व प्रमुख अतिथी यांचे हस्ते सत्कार करण्यातआले या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संतोष कोडगिरकर(शाखा प्रबंधक) किरण देशपांडे प्रमुख पाहुणे(उपमुख्याध्यापक नुतन विधालय)डी के माघाडे प्रमुख अतिथि(शिक्षक शाळा केमापुर) म्हणून उपस्थित होते,नागेश पुराणिक, प्रभाकर भांडवले,योगेश जयभाये,सुभाष राठोड,शमशोदिन शेख,उपेंद्र बेल्लुरकर,भास्कर हिप्परगे,किरण गुंडेकर,प्रदीप कानकाटे,शिवशांत काळे,शिवाजी अघाव,समीर थोरात,जाकेर शेख, रामा धोतरे,कृष्णा बोराडे,मन्मथ देवडे,अमर पाटील,नामदेव मुंढे,राजकुमार नाईकवाडे,शंकर जिवने,संपत कपाळे,साहेबराव राठोड,संदीप जाधव,डॉ अनिल शेळके,प्रकाश रोडगे,कृष्णा गोंगे,व्ही डी शिंदे,सुरेंद्र सराफ,संजय निर्वळ,सुजय काला,संजय मनियार,पांडुरंग चिंचाने,संतोष हरनावळ,बळीराम पाते,एकनाथ हिंगे,अमिर शेख,बबन झोल आदि उपस्थित होते.

# ज्ञानसाधना प्रतिष्ठान येथे शिक्षक दिन उत्साहात संपन्न



धर्मापुरी– येथील ज्ञानसाधना प्रतिष्ठान परभणी शैक्षणिक संस्थे मध्ये विविध विभागाच्या वतीने ५ सप्टेंबर शिक्षक दिनानिमित्त शिक्षकांचे स्वागत व बक्षीस वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षा म्हणून संस्थेच्या सचिव मा. सौ शितल सोनटक्के मॅडम उपस्थित होत्या. तर प्रमुख उपस्थितीमध्ये संस्थेचे सर्व समन्वयक व विभाग प्रमुख उपस्थित होते

. यावेळी सर्वप्रथम क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन या महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करून दीपप्रज्वलन करण्यात आले.

त्यानंतर सौ शितल सोनटक्के मॅडम यांचा संस्थेतील सर्व समन्वयक, विभागप्रमुख ,सर्व शिक्षक वृंद यांच्या वतीने शिक्षक दिनानिमित्त शुभेच्छा देऊन भव्य सत्कार करण्यात आला.

कार्यक्रम प्रसंगी उपस्थित सर्व समन्वयक, विभागप्रमुख, शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांना पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन शीतल सोनटक्के मॅडम यांनी स्वागत करून सन्मानित केले. यावेळी आर. एस. चाफे, भुसारे व्ही.डी., सौ डॉढाळे यु.

के., शिंदे के. डी., शैलेश कुलकर्णी, अशोक डुकरे , निकम जे.टी.विद्या भुसारे मॅडम, श्रीकांत परडे यांनी शिक्षक दिनानिमित्त आपले मनोगत व्यक्त करून शिक्षक दिनाचे महत्त्व सांगितले.

यावेळी दडके सर यांनी सुंदर गीत सादर केले. तर खंदारे सर व चांदणी मॅडम यांनी एकपात्री अभिनय सादर केला

मागील दोन दिवसांमध्ये घेण्यात आलेल्या रांगोळी स्पर्धा ,निबंध स्पर्धा, गीत गायन स्पर्धा, संगीत खुर्ची, एकपात्री अभिनय या स्पर्धेमध्ये प्रथम,द्वितीय, व तृतीय क्रमांक आलेल्या सर्व स्पर्धकांचे मान्यवरांच्या हस्ते भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. सर्व स्पर्धेचे परीक्षक यांचा सुद्धा सत्कार करण्यात आला.

आपल्या अध्यक्षीय भाषणात सौ. शितल सोनटक्के मॅडम यांनी शिक्षकाने आपल्या स्व आदर्श वर्तनातून विद्यार्थ्यांना आदर्श घडवावे व समाजामध्ये आदर्श प्रस्थापित करावा असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभाग प्रमुख कदम पी.व्ही. यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ सावंत एम.एस., सौ सामाले वाय. व्ही. यांनी केले. तर उपस्थितांचे आभार सौ चाफ `कानडे ए.व्ही. यांनी मानले

सर्व समन्वयक, विभाग प्रमुख, शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांच्या परिश्रमातून कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, संपादक : नरसिंह पांडूरंग घोणे यांनी श्रीमती नलिनी अशोकराव देशपांडे यांचेकरीता मॅजिक पब्लीकेशन, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर, जि. लातूर येथे छापून दै. मराठवाडा केसरी कार्यालय, शिवाजी नगर, परभणी, जि. परभणी (महा) येथे प्रकाशित केले. संपादक : नरसिंह पांडूरंग घोणे